**Review Of Research**
**Vol. 2 ,Issue.1 ,Oct; 12**
**ISSN:-2249-894X**

Available online at www.lbp.world

**ORIGINAL ARTICLE**

# 'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' मधील सामाजिकता

**प्रा.सुभाष जयसिंग कदम**
**मराठी विभाग , कर्मवीर भाऊराव पाटील , महाविद्यालय,पंढरपूर, जि.सोलापूर,महाराष्ट्र**

**प्रस्तावना :**

संतोष पद्माकर पवार हे १९९० नंतरचे एक महत्त्वाचे कवी आहेत. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात दिसते, म्हणूनच सामाजिक बदलांचा वेध खऱ्या अर्थाने संवेदनशील साहित्यिक घेत असतो. 'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' हे २००३ मध्ये दीर्घकाव्य प्रसिध्द झाले. या दीर्घकाव्यात एकच छपन्न पानांची कविता आहे. कवीचे अनुभवविश्व खूपच व्यापक आहे. त्यामुळेच सामाजिक बांधिलकीतून पवारांची कविता व्यक्त होते.

समाजातील कुप्रवृत्तीवर भाष्य करण्याचे काम संवेदनशील साहित्यिकांकडून होत असते. त्यामुळे कवी सामान्य माणसाला उपरोधिक शैलीत म्हणतात की,

"तर डोळे गहाण ठेवून
रस्त्यावरून चालणाराहो
तुमच्या सरकारी परवान्याच्या
होळया करा कुठल्याही कुंडात
तुमच्या गांडो मनाला जर सारे जग
सरळच चाललेय असे
वाटत असेल तर लवकर खड्डयात जा.
नाहीतर बुजवून घ्या स्वतःला खाली"
(भ्रमिष्टांचा जाहिरनामा पृ.क्र.१)

सामान्य माणसांना डोळसपणे वागण्याचे आवाहन कवी येथे करतात. म्हणूनच पवारांच्या कवितेतील सामाजिकतेविषयी दिलीप पुरूषोत्तम चित्रे म्हणतात,"संतोष पवार यांची कविता ऐकत असताना आपल्यापैकी अनेकांना–ज्यांना मराठी काव्याचा सगळा इतिहास माहिती आहे. त्यांना तिच्यामध्ये अनेक प्रकारचे ध्वनी आणि प्रतिध्वनी ऐकू आले असतील."[१]

'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' या दीर्घ कवितेतून जे सामाजिक वास्तव येते ते समाजातील अनेक कुप्रवृत्तीच्या व्यक्तिविषयी यामध्ये सडकछाप, टपोरी, पत्रकार, भडवे, महाकवी, साहित्यिक, पुरस्कार विजेते, न्यायाधीश, वकील, गरीब शेतमजूर, साखर कारखानदार, सावकार, बायकांच्या पाठीमागे लपणारे स्वतःला महान म्हणवणारे पुरूष तसेच महिलांच्या कल्याणासाठी कुटनखाना चालवणारे, बालकल्याणासाठी गॅगस्टारांच्या सैनिकशाळा चालविणारे, वृध्दाची हाडके फेकून दंतमंजन करणारे, पैशासाठी आपली माय बाजारात उभी करणारे, रात्री मुडदा पाडून सकाळी सांत्वनासाठी येणारे, सभेत तलवार दाखविणारे राजकारणी, लोकांना धाक दाखविणारे, बंदूकवाले, बॉब गोळे फेकणारे, विध्वंस करणारे गल्लीतील दादा, अशा

सगळया कुप्रवृत्तीच्या समाजाचे वर्णन कवीने या संग्रहातून मांडले आहे. म्हणूनच या समाजव्यवस्थेला कवी परखडपणे जाब विचारताना लिहितात की,

"विध्वंसात मन। धावतेच पुढे
दुसऱ्याचे मढे। काढण्याला
अशांचेच मढे। एकदा पाडूनी
करावी पेरणी। सत्यासाठी"
(संदर्भ पृ.१ ३.)

समाजातील कुप्रवृती संपविण्यासाठी कवी येथे विद्राहाचे शस्त्र हाती घेतात. म्हणूनच केशव मेश्राम पवारांच्या कविते विषयी म्हणतात – "संतोष पद्माकर पवार यांची 'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' ही प्रदीर्घ चिंतन कविता आहे. छप्पन्न पृष्टांची ही एकच कविता कवीच्या विचारलयीचे आणि जीवनविषयक जाणिवांचे सगळे रंगबेरंग, आधोरेखित करताना दिसते. आधुनिक माणसाच्या अवमूल्यनाचे आख्यान कवीने मांडले आहे.[२] मेश्रामांनी व्यक्त केलेले मत योग्य आहे. समाजातील विकृतीवर निर्भिड भाष्य करणारी ही कविता आहे.

संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेतील सामाजिक वास्तव पाहताना गेल्या दोन दशकातील समाजातील बदलाचा विचार करणे आवश्यक आहे. गेल्या दोन दशकात समाजात गरिबी, महागाई, बेकारी, दुष्काळ, कमालीची जातीयता, धार्मिक तेड, शेतीतील शेतकऱ्यांच्या समस्या सामाजिक वास्तव, इत्यादी प्रश्नांविषयी उदासिनता होती. राजकीय व सामाजिक उलधापालथ खूप मोठया प्रमाणात होत आहे. पण या सर्व प्रश्नांना वाचा फोडणारी पवारांची कविता आहे.

कवी समाजातील श्रीमंती–गरिबी, जातीयवाद, धार्मिकवास्तव मांडतात.

"एका धर्म नावाच्या डुकरीणीला
जात नावाची पिलावळ झाली
त्यांचीच आपल्यापर्यंत
चालत वंशावळ आली "
(भ्रमिष्टांचा जाहिरनामा पृ.क्र.४८)

धर्माच्या नावाखाली मोठया दंगली होतात, हजारो लोक बेघर होतात. भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर समाजाची विभागणी होते. माणूस धर्माच्या व जातीच्या खोटया प्रतिष्ठेसाठी स्वतःला आयुष्यभर वाहून घेतो. हेच वास्तव कवी येथे व्यक्त करतो.

"दुसऱ्याच्या धर्मावर हल्ला करण्याची खुमखुमी येते
म्हणे धर्म अफूची गोळी आहे.
ती खाणारा झिंगलाच पाहिजे
एकाच घाण्याभोवती बैल
मरूस्तो बिंगलाच पाहिजे"
(भ्रमिष्टांचा जाहिरनामा पृ.क्र.४८)

कवीचे विचार मार्क्सच्या विचारांशी एकरूप झालेले आहेत. मार्क्सने धर्माला आणि धर्माला आधार असलेल्या ईश्वराला अमान्य केले. शोषकाला सर्व सुखसोयी मिळतात. पण शोषितांना कोणतेही सुख मिळत नाही. म्हणून हा शोषित मनः शांतीसाठी ईश्वर भजनात, भक्तीत रंगून जातो. ही भक्ती केल्याने निदान पुढच्या जन्माच्या आशेवर या जन्माला बळी देऊन शोषकांचा हेतू सफल करतो.

धर्माच्या नावाखाली माणसाचे कसे अधःपतन झाले आहे, याचे येथे विवेचन कवी करतात. 'धर्माने गरीबांचे शोषणच केले आहे. हा इतिहास आहे.' शोषक वर्गाचा धर्म, त्याची तत्वज्ञाने, कायदे, शिक्षण, धर्म ग्रंथ सर्वच गोष्टी गरिबांना लुटण्याचे काम करीत असतात हे वास्तव कवी व्यक्त करतात.

कवी "भ्रमिष्टांचा जाहिरनामा" या दीर्घ कवितेतून समाजातील अधःपतनाला राजकारण कसे कारणीभूत आहे. यावरती कवी भाष्य करतात. दारिद्रय, उपासमारी, भ्रष्टाचार, बेकारी, लाचारी, इ. अनेक प्रश्न कवी परखडपणे मांडतात. कवीने तेरा वर्षे ग्रामसेवक म्हणून काम केले आहे, त्यामुळे ग्रामसंस्कृतीतील वास्तव कवी मांडतात.

आजच्या राजकीय सत्ते विषयी कवी सामाजिक प्रश्न उभे करताना म्हणतात,

"चोर सोडून संन्याशाला
फाशी देत राजकारण
ब्राम्हण सोडून कसायला
काशी दाखवते राजकारण "
(भ्रमिष्टांचा जाहिरनामा पृ.क्र.३४)

'राजकारणातून समाज विकास' हा विचार राजकारणातून कधीच लुप्त झाला आहे, राजकारणातील सामाजिक बांधिलकी आता शिल्लक राहिली नाही. म्हणून कवी समाजाला जागृत करतात की प्रत्येक व्यक्तीची राजकारणी नेते किंमत लावतात त्यावर घोडे बाजार करतात.

काही राजकारण्यांत मोठया प्रमाणात फसवेगिरी, गुंडगिरी, भ्रष्टाचार, लबाडी दिसते. म्हणूनच कवीने समाजाला योग्य राजकीय व्यक्ती निवडण्यासाठी कवी आवाहन करतात की,

"चुत्या बनवून विजयी झालेल्यांच्या
मिरवणूकीत हजार हिजडे नाचले तरी
चालतील,
पण एका विवेकी माणसाचा पाय थिरकता
कामा नये,
पंख झडून मरायची पाळी आली तरी
पिलांच्या रानाकडे पाखरांनी फिरकता कामा नये"
(भ्रमिष्टांचा जाहिरनामा पृ.क्र.३४)

कवी सामान्य माणसांतील विवेक बुद्धी येथे जागृत करतात. लोकांचा स्वाभिमान जागृत करणारा हा विचार व्यक्त होतो आहे. कवीची भाषा जराशी परखड आहे. कोणताही राजकीय पक्ष आपल्या जाहिरनाम्यात अनेक आश्वासन देतो. पूर्तता किती होते हा प्रश्नच आहे.

देशाची राजकीय लोकशाही जपणे, व देशाला महासत्ता बनविण्यासाठी योग्य व्यक्तीची निवड करणे ही अपेक्षा कवी प्राजंल शब्दांत व्यक्त करतात.

कवी समाजातील बदलांचा वेध घेतो. जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर काय परिणाम होत आहे. याचे वास्तव कवी मांडतात. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात मोठया प्रमाणात अनेक सुख–सोयी आल्या. मोबाईल, टी.व्ही. अलिशान गाड्या, शेतीपूरक अवजारे, खादय संस्कृतीतील बदल इ. अनेक बदल आपल्याला दिसतात. पण या सर्व वस्तुवापरावर लोकांचा कल अमर्याद आहे. वरकरणी पाहता हे मुक्त बाजार पेठेचे फलित आहे. पण त्याचे दुरगामी परिणाम नेमके काय होतील, या विषयी कवी चिंता व्यक्त करतात की,

हा जाळीदार राष्ट्रीय कार्यक्रम नाही
हा महा जाकीदार वैश्विक कार्यक्रम आहे.
यात अडकवण्यासाठी प्रत्येकाचा क्रम आहे.

मला काय त्याचे हा आपला भ्रम आहे.
गाफील राहाल तर खबरदार
तुमच्या पुटीलाच पाडतील दार
तुमचा लाईफ प्रोग्राम
लाईव्ह टेलिकास्ट करतील जगाच्या पार
मग बसा हात चोळत"
(भ्रमिष्टांचा जाहिरनामा पृ.क्र.22/23)

साहित्यिकांनी समाजाला जागृत करावे हीच भुमिका घेऊन कवी सामाजिक वास्तव मांडत आहेत. आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या जगभर प्रसारमाध्यमे पोहोचवत आहेत. कवीच्या मनातील समाजाविषयाची आपुलकी, काळजी येथे दिसते.

संतोष पद्माकर पवार यांची कविता माणुसकी व जीवनमुल्ये जपणारी आहे. ग्रामसंस्कृतीवर बदलत्या नागरीकरणाच्या परिणामांची नोंद कवी व्यापकतेने घेतात. परखडपणा, फुटकळपणा, करारीपणा, स्पष्टवक्तेपणा याबरोबर सच्चेपणा हा या काव्यशैलीचा महत्त्वाचा विशेष आहे. वर्तमान व्यवस्थेवर निर्भिडपणे भाष्य करणारी ही कविता आहे. ही कविता वाचकांना चिंतनाभिमुख करणारी आहे. आत्मशोध, आत्मसंवाद, लोकसंवाद, दु:ख, व्यथा, वेदना, व्याकूळता त्याचबरोबर करूणा, शिक्षकीबाणा, समुहभावना इ विश्लेषणांनी ही कविता समकालीन समाजाला जगण्याचे तीव्र भान देत राहते.

**संदर्भ ग्रंथ :–**

१) चित्र दि.पु.'भ्रमिष्टांचा जाहिरनामा' मलपृष्ट अभिधानंतर प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती,ऑगस्ट–२००४.
२)मेश्राम केशव 'अक्षरमर्म' डिंपल पब्लिकेशन मुंबई.–२००६.